# शंकरराव जगताप आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज वाघोली

## विद्यार्थी तक्रार निवारण समिती

**अहवाल** दिनांक: 03/03/2021

महाविद्यालयात विद्यार्थी तक्रार निवारण समिती कार्यरत असून या समितीने शैक्षणिक वर्ष 2020-21 या कालावधीत महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या विविध विषयांवर कार्य केलेले आहे या समितीचा या वर्षाचा वार्षिक अहवाल आपल्यापुढे सादर करताना मी प्रा.डॉ. सावंत जे.सी.स्थायी समिती या समितीचा समन्वयक या नात्याने आनंदित होत आहे.

विद्यार्थी तक्रार निवारण समितीने यावर्षी अतिशय उत्कृष्टरित्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

शैक्षणिक वर्ष 2020-21 या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात विद्यार्थी तक्रार निवारण समितीच्या वतीने विद्यार्थ्यांच्या तक्रारी निवारण करण्याचे काम करण्यात आले. या समितीच्या नियमित कार्यक्रमात दरवर्षी ज्या विद्यार्थ्यांना आपल्या सूचना प्राध्यापक, प्राचार्य यांच्याकडे मांडण्यास भीती वाटते किंवा ज्यांना आपली तक्रार मांडताना अडचणी येतात त्यांच्यासाठी महाविद्यालयात तक्रार पेटी तयार करण्यात आली आहे. या तक्रार पेटी मध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थिनी आपली तक्रार नावासह किंवा नावाशिवाय टाकू शकत होते. परंतु या वर्षी करोना महामारी मुळे विद्यार्थ्यांच्या तक्रारी तक्रार पेटीत येणार नाहीत हे लक्षात घेऊन फोन द्वारे त्यांच्या सूचना घेण्यात याव्यात. विद्यार्थ्यास नाव देण्याची इच्छा नसेल तर त्याच्या नावाशिवाय ही तक्रार घेण्यात यावी असे ठरविण्यात आले होते.

यावर्षी अनेक विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेतला महाविद्यालयातील प्राध्यापक, इतर कर्मचारी आणि महाविद्यालयातील सोयीसुविधा, ग्रंथालय विभाग अशा वेगवेगळ्या बाबींवर विद्यार्थ्यांनी आपल्या तक्रारी दिल्या विद्यार्थी तक्रार निवारण समितीच्या बैठकांमध्ये या विविध विषयांवर चर्चा झाल्या आणि योग्य त्या सूचना अन्वर आणि प्राचार्यांनी कार्यवाही केली आहे अशा रीतीने शैक्षणिक वर्ष या कालावधीत शंकरराव जगताप आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज वाघोली महाविद्यालयातील विद्यार्थी तक्रार निवारण समितीचे कामकाज पूर्ण झाले

समन्वयक

प्रा.डॉ. सावंत जे.सी.

स्थायी समिती

प्राचार्य

Tal-Koregaon.Dist-Satara.

# महिला तक्रार निवारण समिती आणि

## लैगिक छळ प्रतिबंधक समिती

## सन :२०२०–२१

### वार्षिक अहवाल

शंकरराव जगताप महाविद्यालयातील सन २०२०.२१ या शैक्षणिक वर्षातील महिला तक्रार निवारण समिती आणि लैगिक छळ प्रतिबंधक समिती अंतर्गत दि.१७–०२/२०२१ रोजी एक दिवसीय ऑनलाईन वेबीनार सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आला.या वेबीनारचे प्रमुख वक्ते गौरी सोनवणे आणि ज्योती गोयल या होत्या. वेबीनारचा विषय–सायब्रर क्राईम आणि लैंगिक छळ' हा होता. या विषयावर गौरी सोनवणे आणि ज्योती गोयल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महिलावरील अत्याचार या विषयावर आलेली माहिती वृत्तपत्रातील कात्रण व्दारे विद्यार्थीनीचे प्रबोधन करण्यात आले. अशाप्रकारे या समितीमार्फत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

समिती प्रमुख

प्राचार्य

PRINCIPAL
SHANKARRAO JAGTAP ARTS &
COMMERCE COLLEGE, WAGHOLI
Tal-Koregaon Dist-Satara